ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Resarch Journal
Volume : II Issue : XI Jan. to Mar. - 2019



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor
**Sarkate Sadashiv Haribhau**
Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

# अनुक्रमणिका (Index)



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Effect of Diazepam on the development of Chrysomya megacephala (Diptera: Calliphoridae) | Haribhau M. Pawar | 1 |
| 2 | ONE POT SYNTHESIS OF PYRAZOLO PHTHALAZINE DIONE DERIVATIVES WITH BORIC ACID AS CATALYST UNDER | Ashish Wadodkar | 9 |
| 3 | The Study of Impact of Fringe Benefit on Employee in Indian OrganizationMr. Dr. | Ulhas N. Medshikar | 14 |
| 4 | A SIMPLE AND CONVINIENT ONE POT SYNTHESIS OF 2-ARYL BENZIMIDAZOLE DERIVATIVES USING ZIRCONIUM | Ashish Wadodkar | 19 |
| 5 | Organized Retail Scenario in India | Asst. Prof. Dr. Balaji ShivrajHokarne | 24 |
| 6 | भारत सरकारची शालेय पोषण आहार योजना आणि त्याची | श्रीमती रंजना पुनमचंद शिंगाडे | 28 |
| 7 | स्त्रीवादी इतिहास | माळी नितीन वसंतराव<br>प्रा. डॉ. कार्तिक गावंडे | 32 |
| 8 | महाराष्ट्र राज्यातील जमीन उपयोजनातील रचनात्मक बदल | प्रा.डॉ.पी.डी.जाधव | 36 |
| 9 | ज्ञानेश्वरीतील मंगलाचरणे आणि ज्ञानदेवांचा काव्यहेतू | प्रा. भा. भा. नेटके | 40 |
| 10 | महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांचे शैक्षणिक क्षेत्रातील भूमिका | राठोड विनायक श्रीधर | 46 |
| 11 | प्रशासकीय सुधारणा | डॉ. बिरंगणे एस.एस. | 48 |
| 12 | निसंतान दम्पति जीवन की व्यथा रेती कहानी | प्रा. डॉ. पवन नागनाथराव एमेकर | 51 |
| 13 | Citation Analysisof Doctoral theses awarded by Shivaji University, Kolhapur during 1962-2012 in the subject of Microbiology | Mrs. Shobha G. Dolas, Dr.Shalini M. Sakharkar | 54 |
| 14 | Reflection of Woman Psyche in Amit Chaudhuri's Afternoon Raag | Dr. Laxmikant Bahegavankar | 60 |
| 15 | सर्वाधिक आत्महत्या दोन हेक्टरपेक्षा कमी शेती असलेल्या शेतकऱ्यांच्या विशेष संदर्भ नाशिक जिल्ह्यातील 100 आत्महत्याग्रस्त शेतकरी | डॉ. यादव घोडके | 62 |

# स्त्रीवादी इतिहास

प्रा. डॉ. कार्तिक गावंडे
विभागप्रमुख, इतिहास विभाग
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

माळी नितीन वसंतराव
संशोधक विद्यार्थी

भारतीय स्त्री-जीवन कालपरत्वे पराधिन, परावलंबी होत गेल्याचे चित्र स्त्री जीवनाच्या अभ्यासातून दिसते. वैदिक कालखंडामध्ये स्त्री ला सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य होते. वैदिक कालखंडानंतर उत्तरोत्तर हे स्वातंत्र्य कमी होऊन मध्ययुगीन कालखंड येईपर्यंत स्त्री ही एक भोगवस्तू बनली होती. तिच्यावरील अत्याचाराची परिसिमा निर्माण झाल्या होत्या. युरोपातील परिवर्तन व प्रबोधनाने जगाच्या क्षितीजावर आलेला वेगळा विचार प्रवाह स्त्री जीवनाला कलाटली देणारा ठरला. हीच विचारसरणी ब्रिटीशांच्या मागोमाग भारतात आली. आणि ही ब्रिटीश राजवट स्त्रीयांसाठी वरदान ठरली. बालविवाह बंदी, विधवा पुर्नविवाह, सतीप्रथा बंदी असे नवनवीन विचार भारतामध्ये राजा राममोहनरॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, आगरकर, महर्षी कर्वे, महर्षी शिंदे इ. समाजसुधारकांची पिढी अवतरली व स्त्रीसुधारणांचा पाठपुरावा झाला. समाजक्रांतीकारक महात्माज्योतिबा फुले यांनी स्त्री शिक्षणाचे युगप्रवर्तक कार्य केले. 'गुरुणा माता गरीयसी' हा उक्ती दृष्टीसमोर ठेवून १८४८ मध्ये पहिली मुलींची शाळा पुण्याला काढून स्त्री शिक्षणाची व्दारे स्त्रियांना उघडी केली.

सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक शोषणाला बळी पडलेल्या स्त्रीला ज्ञानामृत मिळाले. गोवर्धनदास पारीख हे १९ व्या शतकातील विचारवंतात ज्ञानगंगोत्री मूलगामी विचार जोपासणारा, आमुलाग्र क्रांतीची मुहूर्तमेढ रोवणारा हा क्षण होता भोकरवाडी चिपळमवाडी, रास्तापेठ, वेताळपेठ इ. शाळा निघाल्या व शिक्षणाचे वारे वाहू लागले. सावित्रीबाई फुलेंची कामगिरी गौरवास्पद ठरते. [१]

'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उध्दारी' असे मत फुलेंनी व्यक्त करुन एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटूंब शहाणे होते असे मत मांडले.

याच काळात काही वृत्तपत्रांनी विधवांची दुर्दशा मांडली. 'दर्पण', 'प्रभाकर' या वृत्तपत्रांनी आवाज उठवीला.परिणामी १८५६ च्या विधवा विवाह कायदयाची निर्मिती झाली.ही चळवळ पुढे पंडिता रमाबाई यांनी चालवून ११ मार्च १८८९ रोजी विधवा कुमारीकासाठी शारदा सदन ही संस्था काढली 'ज्ञानोदय' वृत्तपत्राने याचा गौरव करतांना "ज्या प्रमाणे प्लासी, वॉटर्लू इ.लढायावरुन मोठया क्रांत्या व राजकिय फेरफार झाले तसेच कार्य रमाबाईंनी स्त्री शिक्षणात घडवून क्रांती केली." असे विधान केले. [२]

या नंतर डॉ.आनंदीबाई जोशींनी हंटर कमिशन समोर स्त्रीयांची वैद्यकिय शिक्षणाची मागणी केली. रखमाबाई, आनंदीबाई कर्वे यांनी परित्यक्ता विधवा, निराधार स्त्रियांना नर्सिंगचे शिक्षण दिले.इ.स.१८३५ मध्ये मुंबई मध्ये ग्रँट मेडीकल कॉलेज स्थापन झाले.१९०० साली १२२ मुली येथे वैद्यकिय शिक्षण घेत होत्या. इ.स.१८८६ मध्ये 'कामा हॉस्पीटल' ची स्थापना होऊन तेथे १९०० साली १२८ नर्सेस नर्सिंगचे शिक्षण घेत होत्या.तसेच कायदयाच्या शिक्षणाचा पाठपुरावा कॉर्नेलिया सोराबाजी यांनी करुन स्त्रियांना न्याय मिळवून देणे सुरु केले.तसेच ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री पुरुष तुलना' हे पुस्तक लिहून पुरुषप्रधान समाज व्यवस्थेवर टिकास्त्र उगारले.

याच शतकात बैरामजी मलबारी इंग्लंडला जाऊन तेथील तत्वचिंतक व स्त्रियांच्या साहाय्याने हिंदूस्थान सरकारवर दडपण आणून १८९१ मध्ये संमती वयाचा कायदा त्यांनी पास करुन घेतला. रमाबाई रानडे यांनी विधवा,

परित्यक्ता स्त्रीयांना उद्योगधंदे पुरवून त्यांचे पुनर्वसन केले. स्त्रियांच्या मतदानाचा हक्क चळवळ करुन मान्य करुन घेतला. ही १९ व्या शतकाची स्त्री चळवळीची वाटचाल होय.

२० व्या शतकात अनुभवाने, नविन दृष्टी , आत्मविश्वास समाजकारण, राजकारण, पाश्चात्य चळवळी, लेखन या मुळे स्त्रियांची जाण प्रगल्भ होऊन त्यांनी संघटीत लढ्याचे स्वरुप स्विकारुन चळवळ व्यापक बनवली.अनेक स्त्री संघटनांचा उदय झाला.याचवेळी महात्मा गांधीनी स्वातंत्र्य लढयात स्त्रियांना कार्य करण्याची संधी देउन राजकारणात आणले. डॉ.राममनोहर लोहिया यांनी साम्यवादी पक्षाद्वारे शेतकरी व कामगार संघटनेत स्त्रियांना सहभाग देउन त्यांना कृतिशील बनविले .तेलंगण्याचा रझाकार विरोधी लढा व हैद्राबाद मुक्तीसंग्रामात स्त्रिया सहभागी झाल्या .

स्त्री चळवळीतील सर्वात महत्वाचे कार्य महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पार पाडले. २८ जुलै १९२८ ला राष्ट्राच्या निर्माणकर्त्या स्त्रीला गर्भावस्थेत विश्राम मिळावा म्हणून मुंबई विधान परिषदेत स्त्री कामगारांकरीता प्रसूती काळात विश्रामासाठी 'फॅक्टरी ॲक्ट' मांडून पास करुन घेतला. स्त्रीजात ही समाजाचा अलंकार आहे. स्त्रीचा खरा उध्दार बाहय वेषातील बदलाने अथवा भौतिक संपन्नतेने होत नाही तर मानसिक विकासाने होतो.कोणत्याही समाजाच्या प्रगतीचे अनुमान त्या समाजातील प्रगत महिलांवरुन लावले जाते. माता ही मुलाची पहिली गुरु आहे.मूल आपल्या वाढीसाठी जसे अमृतोच धडे प्राशन करते तसे बौध्दिक वाढीसाठी ज्ञानामृते त्यास आवश्यक असते ते त्याला योग्यवेळी मिळणे जरुरीचे असते स्त्रिला शीलाशिवाय शिक्षणाची किंमत शुन्य आहे. त्यामुळे स्त्रिने याचाही विचार करावा.इ.विचारांनी डॉ.आंबेडकरांनी स्त्रिवर्गात चैतन्य निर्माण केले.[३]

बाबासाहेबांचे स्त्रियांचे सर्वात मौलिक कार्य म्हणजे हिंदू कोड बील होय.हे बील स्त्रिमुक्ती आंदोलनाचा कळस ठरते.

- स्त्रिला संपत्तीचा वारसा हक्क
- घटस्फोटाचा हक्क.
- दत्तक घेण्याचा हक्क
- विधवांना विवाहाचा हक्क.
- स्पेशल मॅरिज ॲक्ट.

अशा या कायदयातील बाबी महिलांना प्रेरक ठरल्या. तसेच संविधानातील आर्टीकल १४ ते २१ पर्यंत त्यांनी स्त्रियांना कायदयाने समता व सामाजिक न्याय मिळवून देण्याच्या तरतूदी करुन ठेवल्या परिणामता स्त्रिया स्वयंपूर्ण होउन चळवळी उभारु लागल्या. मोर्चे ,निदर्शने ,सभा,संमेलने करु लागल्या अशा रितीने त्यांनी स्त्री चळवळीला तात्विक व नैतिक बैठक प्राप्त करुन दिली. याचवेळी आदिवासी स्त्रियांना सुधारीत हिंदू कायदा ६ अ लागू करण्याची मागणी सत्यशोधक, मार्क्सवादी, बायजाबाई या नियतकालीकांमधून करीत होते.स्वातंत्र्यानंतरही या क्षेत्रातील महिलांचे कार्य विविध आदोलनांद्वारे दिसून येते. ३७६ बलात्कारासबंधी असणा-या कलमात बदल करावयास लावून, हुंडा प्रतिबंधक कायद्यात सुधारणा करुन नुतन बीले पास करण्यात आली. घटस्फोटाच्या कायदयात, द्विभार्या प्रतिबंधक कायदयात, बालविवाह प्रतिबंधक कायदयात सुधारणा इ. बाबी यासाठी आजही स्त्री संघटना प्रयत्नशील आहेत. स्त्रियांच्या विकृत चित्रणाविरुध्द, पोस्टर्सची होळी या चळवळी समाजात आवाज उठवीत आहेत.

१९७५ ते १९८५ हे दशक स्त्री चळवळीचे कृतीशील दशक मानले जाते .तरीही नैरोबी अधिवेशनात ज्यावेळी स्त्रियांच्या एकूण आर्थिक ,सामाजिक व राजकिय हक्कांचा आढावा घेतांना पशुवृत्ती, हंडाबळी, बलात्कार

यांचे प्रमाण वाढले असल्याचे तसेच स्त्रियांवरील अत्याचारांनी कळस गाठल्याचे Violence against women या पुस्तकातील आकडेवारीने सिध्द केले ही भारतीय संस्कृतीला काळीमा लावणारी बाब ठरते.[४]

बिजींगच्या परिषदेतील मानवी हक्काच्या जाहिरनाम्यात स्त्रिच्या हक्कांना एक अतूट, संलग्न व अविभाज्य भाग मानून स्त्रीयांना राजकिय आर्थिक, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात पूर्णपणे व समतेच्या पातळीवर सहभाग मिळवून देणे व स्त्री पुरुष भिन्नतेवर आधारित असलेले सर्व त-हेचे भेदभाव नष्ट करणे ही आंतरराष्ट्रीय जगाने आपली प्रमुख उद्दिष्ट्ये मानली.

या चळवळीच्या समांतर अशी साहित्याच्या क्षेत्रात स्त्रियांची दु:खे प्रगट करण्याचे कार्य स्त्री लेखीकांनीही नोंदवीले. लक्ष्मीबाई टिळक, बहिणाबाई चौधरी, संजिवनी मराठे, इंदिरासंत, शांता शेळके, पदमा गोळे, विभावरी शिरुरकर, गिता साने, मालती बेडेकर, शांताबाई नासिककर, कुमुदिनी प्रभावळकर, काशीबाई कानीटकर, गिरीजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के यांनी साहित्य व नाटकांच्या माध्यमांद्वारे स्त्री व्यथा मांडल्या. दलित स्त्रियांनी लोकगितांच्या माध्यमाद्वारे व आंदोलने व मोर्चाद्वारे ही चळवळ ज्वलंत बनवली. स्त्रीमुक्ती आणि स्त्रीवादी संकल्पना पाश्चात्य राष्ट्रामधील आहेत. स्त्रिवाद म्हणजे स्त्रिची सर्व क्षेत्रातील समानता, स्त्री -पुरुष समानता, स्त्रिचे वैयक्तिक स्वातंत्र्य होय.[५]

इतिहास लेखन क्षेत्रात Subalntern विचारधारेने सामान्यांचा इतिहास लिहितांना शोषीत, वंचित, उपेक्षीतांचा इतिहास लिहिणे गरजेचे आहे. आतापर्यंत केवळ अभिजनांचाच इतिहास लिहीला गेला. पण शोषीतांच्याही कामगिरीचा इतिहास लिहिला गेला पाहिजे हा विचार ॲन्टोनियोग्रामची याने मांडून 'हेजीमनी सिध्दांत' व्यक्त केला. ६ या गटात डॉ.रणजीत गुहा, सुमीत सरकार, ग्यान पांडे यांचे इतिहास लेखन उपेक्षीत, दुर्लक्षीत गटांना प्राधान्य देते. यामध्ये स्त्री संदर्भातील लेखन महत्वाचे ठरते.[७]

पश्चिमेकडील आधुनिकता व उत्तर आधुनिकता यामधून उगम पावणाऱ्या स्त्रिवादाचे धागेदोरे आपल्याकडील मुठभर सुशिक्षीतांपुरतेच मर्यादीत आहेत. ते प्रत्यक्षात येथे कधीच रुजले नाहीत कारण जातीयता ही संकल्पना येथील बहुसंख्यांकाना सत्ताधारी बनविते व अल्पसंख्यांकाना सत्ताहीन बनविते ही येथील रंजल्या गांजल्यांची व स्त्रीवर्गाची शोकांतीका होय स्त्रिवादी आकलन व त्याचे भारतातील उच्च जातीय मध्यमवर्गीय स्त्रियांच्या चळवळी पडलेले प्रतीबिंब, वैश्विक भगीनीभाव या तत्वांनी प्रेरीत झालेले होते. जातीयतेमुळे व पुरुष सत्तेमुळे रंजीत झालेल्या स्त्रिया भगिनीभावाने एकत्र यायला तयार असतात पण उच्च वर्णिय स्त्रिने त्यांना सामावून घेणे आवश्यक आहे. आज २१ व्या शतकातही स्त्रियांचे प्रश्न भेडसावीत आहेत स्त्रिवरील अन्यायाने उच्चांक गाठलेला आहे. घटनात्मक समानतेमधील हेतू जोपर्यंत लोकांना समजणार नाहीत तोपर्यंत खरी समानता प्रस्तापित होणार नाही. आज स्त्रिमुक्तीच्या कितीही वल्गना केल्यातरी स्त्रीकडे पाहण्याचा संकुचीत दृष्टीकोन अजुनही गेलेला नाही. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे नुकतेच ८ मार्च २०१० ला महिला विधेयकाला विरोध करतांना झालेला गोंधळ व पुरुषी अहंकाराचे लाजीरवाणे प्रर्दशन .

सर्व शासकिय अहवालांमध्ये स्त्रिस्थितीचे दारुण चित्र उभे असतांना बलात्कार , हुंडाबळी असे गंभीर प्रश्न समोर असतांना शासनाने लोकशाही मुल्यांचा विचार करुन जॉन रोल्सच्या जस्टीसला प्राधान्य दयावे तो न्याय म्हणजे स्वत:बदद्ल व इतरांबदद्ल असलेला अज्ञानाचा बुरखा काढून टाकाला पाहिजे व डोळस दृष्टीने स्त्री चळवळीकडे पाहिले पाहीजे.

खऱ्या अर्थाने आज स्त्रिजात संघटीत होणे गरजेचे आहे. उच्च वर्णिय श्रीमंत, गरीब, कनिष्ठ स्तरातील स

स्त्रियांनी एकत्रीत येउन आपली स्त्रिमुक्ती चळवळ लढवीली पाहिजे.हे करतांना ग्रामीण व दलित स्त्रियांच्या प्रश्नांकडे स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून जागरुकतेने लक्ष घालणे आवश्यक आहे. यावेळी आपले आत्मबळ वृध्दिंगत करुन स्त्रियांनी समोर आलेल्या संकटांशी सामना करीत आव्हाने पेलली पाहिजेत.तेव्हाच स्त्री चळवळींना भविष्यात यश प्राप्त होईल व स्त्रिवाद ख-या अर्थाने भारतभूमीवर यशस्वी होईल.

संदर्भ:


१) डॉ. गेल ऑम्व्हेट - ज्योतिबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार.

२) ज्ञानोदय, २१ मार्च १८८९.

३) अ.म.सहस्त्रबुध्दे - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १०१ नैतिक विचार, संकलन. धनंजय कीर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पृष्ठ ८७.

४) अॅड. सुनिति पुंगलिया - स्त्री आणि कायदा, पृष्ठ १८.

५) शरद पाटील - आदिवासी दलित स्त्रीयांचे प्रश्न, परामर्श, मे.१९८९.

५) बायजा मासिक - नैरोबी येथील आंतरराष्ट्रीय महिला परिषदेचा संदर्भ.

६) Jenifer Baumgardner and Amy Richards- What is Feminism, W.W.W. Feminist. Com./ resources /artspeech/genwom/wha tisem. htm

७) डॉ. माणिकलाल गुप्ता - इतिहास लेखन, धारणायें एवं पध्दतीयाँ, अमित पब्लीकेशन, कानपूर, पृष्ठ १६३, १६४, २०४.

८) डॉ. प्रभाकर देव - इतिहास एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड, पृष्ठ ३५१ ते ३५४, २००२.


❖❖❖❖